MHYA210002262026

## आदेश निशाणी क्रमांक ०१ खाली

[दिनांक-२९/०६/२०२६]

१] अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांचे नावे वारसान प्रमाणपत्र देण्याकरिता मुंबई नियमन कायदा, १८२७ चे कलम २ अंतर्गत दाखल केला आहे.

२] अर्जदारांचे असे म्हणणे आहे की, अर्जदार क्र.१ चा भाउ, अर्जदार क्र.२ ते ६ चे मामा मयत बापुराव हरबाजी पानघाटे हे मौजा वणी, ता.वणी, जि.यवतमाळ येथील कायमचे रहिवासी होते. ते दि.१८/०४/२०१८ रोजी मौजा वणी, ता.वणी, जि.यवतमाळ येथे मरण पावले. तसेच, मयत बापुराव हरबाजी पानघाटे यांची पत्नी विमलबाई बापुराव पानघाटे ह्या दि.१९/१०/२०२५ रोजी मरण पावल्या. त्याचप्रमाणे, मयत बापुराव हरबाजी पानघाटे यांची बहीण पार्वताबाई महादेव मोरे ह्या देखील दि.२८/०७/२०१८ रोजी मरण पावल्या. अर्जदार क्र.२ ते ६ हे मयत पार्वताबाई महादेव मोरे यांचे वारस आहेत. मयत बापुराव हरबाजी पानघाटे हे निपुत्रीक मरण पावले. सबब, अर्जदार हे मयत बापुराव हरबाजी पानघाटे यांचे एकमेव वारस आहेत. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्राची गरज आहे. अर्जदार वगळता इतर कुणीही मयत बापुराव हरबाजी पानघाटे यांचे वारस नाहीत. सबब, त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३] अर्जदारांचे विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. त्यांनी अर्जातील कथनांप्रमाणे आपला युक्तिवाद सादर केला. अर्ज व त्यासोबत दाखल केलेल्या दस्तऐवजांचे अवलोकन केले. अर्जदारांनी त्यांचे अर्जाचे अनुषंगाने नि.क्र.०६ नुसार जाहिरनामा प्रसिध्द केला. सदर जाहिरनाम्याची प्रत ही नगर परिषद, वणी, तहसिल कार्यालय, वणी व दिवाणी न्यायालय, वणी यांचे नोटीस बोर्डावर व मयताचे घरावर

लावण्यात आली. तसेच, अर्जदारांनी दि.२९/०४/२०२६ रोजीचे दैनिक लोकदुत या वृत्तपत्रात जाहीर नोटिस प्रकाशित केली. अर्जदारांनी वृत्तपत्राची प्रत जाहिर नोटिस नि.क्र.२३ वर दाखल केली आहे. परंतु, अर्जदारांचे अर्जास आक्षेप प्राप्त झाला नाही.

४] अर्जदारांतर्फे अर्जदार क्र.४/लता जितेंद्र बोदाडकर यांनी त्यांचा पुरावा नि.क्र.११ वर दाखल केला. अर्जदारांनी मयत बापुराव पानघाटे, विमलताई पानघाटे, पार्वताबाई मोरे यांचे मुळ मृत्यु प्रमाणपत्र, सर्व अर्जदारांचे आधार कार्डचे प्रमाणित प्रती, इत्यादी कागदपत्रे अनुक्रमे नि.क्र.१४ ते २२ वर दाखल केले. अर्जदारांचा पुरावा अपरिवर्तित राहिला आहे. त्यावर विश्वास न ठेवता येणारी कुठलीही बाब न्यायालयासमक्ष आली नाही. अभिलेखावरील पुराव्यावरुन असे दिसून येते की, अर्जदार हे मयत बापुराव हरबाजी पानघाटे यांचे कायदेशीर वारस आहेत. मयत बापुराव हरबाजी पानघाटे यांना अर्जदारांव्यतिरीक्त इतर कोणीही वारस नाहीत. सबब, अर्जदारांचे नावे वारसान प्रमाणपत्र देण्यास कोणताही अडथळा येत नाही. म्हणून, मी पुढील आदेश पारित करीत आहे ;

## आदेश

१] अर्ज मंजुर करण्यात येतो.

२] अर्जदारांना **मयत बापुराव हरबाजी पानघाटे** यांचे कायदेशीर वारस म्हणून घोषित करण्यात येते.

३] अर्जदारांनी विहित मुद्रांक शुल्क जमा केल्यानंतर त्यांचे नावे वारसान प्रमाणपत्र देण्यात यावे.

SHAHAJI DATTARAO BHOSLE
Digitally signed by SHAHAJI DATTARAO BHOSLE
Date: 2026.06.29 16:28:10 +0530

ठिकाण : वणी
दि.२९/०६/२०२६

**(शहाजी दत्तराव भोसले)**
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), वणी.

मी, अभय प्रमोद भोयर, लघुलेखक (सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) तथा न्यायदंडाधिकारी, (प्र.श्रे.), वणी) याची पुष्टी करतो की, या पी.डी.एफ. ची सामग्री ही मुळ आदेशाच्या शब्दाप्रमाणेच शब्द आहे.